

भिमराव-लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

♦ साप्ताहिक

# संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013

वर्धापनदिन विशेषांक २०२६
मो.७२७६८७१००८

■ वर्ष : १४ वे ■ अंक : ०१ ला ■ सोमवार दि. २७ जुलै ते ०२ ऑगस्ट २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने – १२


## आजी-माजी नगरसेवकांसह कुटुंबीयांनाही वैद्यकीय योजनेचा कायमस्वरूपी लाभ तर दुसरीकडे कंत्राटी कामगार वैद्यकीय उपचाराविना मरत आहे; याला जबाबदार कोण?

### अतिरिक्त आयुक्तांनी कार्यालयीन आदेश काढल्यावर त्याचा आढावा घ्यावा म्हणजे किती पारदर्शक कारभार आहे हे समोर येईल




**संघटनेच्या मागण्या :**

***संबंधित ठेकेदारावर तात्काळ चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी.**
***मृत कामगाराच्या कुटुंबाला योग्य आर्थिक मदत व न्याय मिळावा.**
***येरवडा क्षेत्रीय कार्यालयातील सर्व कंत्राटी कामगारांची ESIC नोंदणी व कार्डांची तातडीने पडताळणी करण्यात यावी.**
***भविष्यात कोणत्याही कामगाराचा जीव अशा निष्काळजीपणामुळे जाऊ नये, यासाठी संबंधित अधिकारी व ठेकेदारांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.**
***एका कामगाराचा जीव गेला आहे. हा केवळ अपघात नाही; जर नियमांचे पालन झाले नसल्याचे सिद्ध झाले, तर ही गंभीर निष्काळजीपणाची बाब आहे. प्रत्येक कंत्राटी कामगाराला त्याचे कायदेशीर हक्क मिळालेच पाहिजेत. दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत कामगार हितरक्षक संघ शांत बसणार नाही. असे शरद भाकरे म्हणाले आहेत.**

**पुणे** : पुणे महापालिकेचे आजी-माजी नगरसेवक, शिक्षण मंडळाचे आजी-माजी सदस्य तसेच पुणे महानगरपरिवहन महामंडळ (पीएमपीएमएल) च्या आजी-माजी सदस्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना महापालिकेच्या अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेच्या कायमस्वरूपी लाभ देण्याचा निर्णय काही दिवसापुर्वी स्थायी समितीच्या बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे आता माजी सदस्यांच्या कुटुंबीयांचा वैद्यकीय खर्चाची बिले सर्वसामान्य पुणेकरांच्या कराच्या पैशातून अदा केली जाणार आहेत. तर दुसरीकडे पुणे महापालिकेमध्ये जवळ-जवळ सर्वच विभागामध्ये कंत्राटी कामगार काम करत आहे. त्यांना वैद्यकीय उपचार मिळवून घेण्यासाठी ठेकेदार, अधिकारी, नगरसेवक, कामगार कल्याण अधिकारी यांची दारे झीजवावी लागतात. याकडे कोण लक्ष देणार? येरवडा क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत स्मशान आरोग्य कोठी येथे कार्यरत कंत्राटी सेवक श्री.विनोद शामराव कांबळे यांना काही दिवसापुर्वी सायंकाळी ५ च्या दरम्यान अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला. मात्र, संबंधित ठेकेदाराने नियमानुसार ESIC कार्ड काढून दिले नव्हते तसेच पात्र कुटुंबीयांची नावेही समाविष्ट केली नव्हती. त्यामुळे आर्थिक अडचणींमुळे त्यांना ससून रुग्णालयात दाखल करावे लागले. यावेळी कामगार हितरक्षक संघ महाराष्ट्र राज्यचे शरद भाकरे आणि पदाधिकारी तसेच सामाजिक कार्यकर्ते श्री.डॅनियल भाऊ लांडगे आणि त्यांचे सहकारी घटनास्थळी रुग्णालयात उपस्थित राहून सर्वतोपरी मदत करत होते. दुर्दैवाने वेळेत आवश्यक उपचार मिळू शकले नाहीत आणि त्यांचा मृत्यू झाला.

ठेकेदाराला काम मिळाल्यानंतर नियमानुसार निश्चित कालावधीत कामगारांचे ESIC नोंदणी पूर्ण करून त्यांना कार्ड उपलब्ध करून देणे ही ठेकेदाराची जबाबदारी आहे. जर या जबाबदाऱ्यांचे पालन झाले नसेल, तर त्याची सखोल चौकशी होऊन संबंधितांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. असे शरद भाकरे म्हणाले. (पान ४ वर)



येरवडा क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत नानासाहेब परुळेकर आरोग्य कोटी येथील कंत्राटी सेविका सौ. मलिकाताई सिग्राम यांचे पती श्री.तारकेश सिग्राम यांच्यावर तब्बल १५ तास चाललेली अत्यंत गुंतागुंतीची लोबेक्टॉमी शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे.

या कठीण प्रसंगी कुटुंब पूर्णपणे खचले होते. मात्र कामगार हितरक्षक संघाने योग्य वेळी हस्तक्षेप करून आवश्यक रुग्णालयाशी समन्वय आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. त्या प्रयत्नांमुळे आज ही शस्त्रक्रिया यशस्वी झाली असून संपूर्ण कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.



येरवडा क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत राजमाता आरोग्य कोटी येथील कंत्राटी सेविका अनुराधा कांबळे यांची मुलगी अर्पिता कांबळे यांना पॅरेलेस आल्यामुळे डी.वाय.पाटील हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले होते कामगार हितरक्षक संघटनेच्या वतीने त्यांना पूर्ण मदत करण्यात आली




# संपादकीय...

## ''संघर्षाचा आवाज'' झालाच पाहिजे!

प्रत्येक व्यक्ती आपापल्या जीवनात आपल्या हक्कासाठी संघर्ष करत असतो. मग तो अन्याय झाला म्हणून, दुर्लक्षित केले म्हणून, डावलले म्हणून, त्या-त्या व्यक्तीच्या अधिकारापासून वंचित ठेवले म्हणून तो संघर्ष करत असताना त्या-त्या वंचित, दुर्लक्षित, पिडीत, शोषितांचा आवाज म्हणून सा. ''संघर्षाचा आवाज'' या वृत्तपत्राने नेहमी शासन दरबारी त्यांची व्यथा मांडण्याचा आणि त्यातून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न नेहमी केला आहे. रेशन कार्यालय ते जिल्हाधिकारी यांच्यामार्फत व जन्मापासून ते मृत्युपर्यंत येणाऱ्या अडी-अडचणीचे प्रश्न पुणे महापालिका व शासनस्तरावर सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्र शासन स्तरावर नेहमीच अधिकारी यांच्याकडून केला जाणारा भेदभाव हा चव्हाट्यावर आणून शासन दरबारी अधिकारी यांना उघडे पाडले आहे. तर जनहिताचीच कामे म्हणून स्वहितांची कामे करणारे नगरसेवक, आमदार यांच्याही विरोधात मोहिम चालू करून स्थानिक नागरिकांना व सामाजिक कार्यकर्त्यांना जागृत केले आहे. आणि पुढेही अशाच पध्दतीने हा ''संघर्षाचा आवाज'' होणारच आहे.

हे सर्व सांगण्याचा खटाटोप करण्यामागे सा. ''संघर्षाचा आवाज'' चा तेरावा वर्धापनदिन साजरा करत असताना चौदाव्या वर्षात पर्दापण होत आहे आणि हे सर्व तुंम्हा वाचक, हिंतचिंतक, शिवराय, फुले, शाहु, आंबेडकर विचार धारेवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांपासून ते नेत्यांनी दिलेल्या भक्कम पाठिंब्यामुळे हे शक्य झाले आहे. याच पध्दतीने या पुढेही आपणा सर्वांची साथ आणि जाहिरातदारांनी केलेले सहकार्य नेहमीच सा. ''संघर्षाचा आवाज'' बरोबर राहो ही विनंती करतो. कारण प्रस्थापित, सत्ताधारी यांच्या विरोधात जाऊन सत्य समोर आणण्यांचे काम आजपर्यंत केले आहे. सर्व सामान्य कार्यकर्त्यांचे हक्काचे व्यासपीठ म्हणून प्रथम त्याला संधी दिली गेली आहे. रस्ता, पाणी, वीज, शाळा, आरोग्य, अन्नधान्य, बेरोजगार, महागाई, भ्रष्टाचार, आरक्षण यासह कित्येक विषयांवर सखोलपणे विषय मांडून सोडविण्याचा प्रयत्न नेहमी केला आहे.

असंघटीत कामगारांचा प्रश्न १८ डिसेंबर २०१८ पासून हातात घेवून आजपर्यंत चालू ठेवल्यामुळे पुणे महानगरपालिकेतील असंघटीत कामगार यांना किमान वेतनानुसार वेतन मिळत नसले तरी आज बऱ्यापैकी वेतन मिळण्यास महत्वाचा वाटा हा ''संघर्षाचा आवाज''चा आहे हे सांगताना अभिमान वाटतो, कारण ज्यावेळी या असंघटीत कामगार/कंत्राटी कामगारांना किमान वेतन, ईएसआय, ईपीएफ, सुरक्षा साधने व गणवेश दिला जात नव्हता त्यावेळी कोणतीही संघटना व युनियन एवढी आक्रमक म्हणजे आज ज्यापध्दतीने वांरवांर सहाय्यक आयुक्त, उपायुक्त यांच्याकडे कंत्राटी कामगारांच्या संदर्भात पत्रव्यवहार करतात त्यावेळी नव्हती ज्यावेळी या कंत्राटी कामगारांचा सविस्तर विषय सरकार दरबारी मांडायला लागलो तेंव्हा संघर्षाचा आवाजला सर्व श्रेय जाईल आणि आपले अस्तित्वाचे काय याचा प्रश्न पडल्यानेच काही प्रस्थापितांच्या संघटना पुढे आल्या पण आम्हांला श्रेय नकोच आहे. कारण आजपर्यंत खुप मोठ-मोठी कामे करताना कधी नावाची अपेक्षा केली नाही. पण बहुजन समाजातील नागरिकांना, कामगारांना आम्ही तुमच्यासाठी काम करतो म्हणून त्यांची पिळवणूक करणे बंद केले पाहिजे. पुणे महानगरपालिकेत कंत्राटी सेवक असो की, कायम आणि त्याठिकाणी सामान्यांतला सामान्य नागरिक हा आपली व्यथा घेवून आलेला असेल. त्याला न्याय देण्याचा प्रयत्न शंभर टक्के संघर्षाच्या आवाजाने केलेला आहे. म्हणून या नवीन वर्षात प्रवेश करत असतांना यापुढेही याच पध्दतीने ''संघर्षाचा आवाज'' झालाच पाहिजे म्हणून शिवराय, फुले, शाहु, आंबेडकर विचारधारा मानणाऱ्या कार्यकर्त्यांपासून नेते, सर्व सामान्य नागरिकांनी नेहमी सा. संघर्षाचा आवाज च्या पाठीशी ठामपणे उभे राहावे हिच विनंती.

साप्ताहिक. संघर्षाचा आवाज मालक – यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग – सी – २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे – ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

**आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात**

Email : sangharshachaaawaz@rediffmail.com

Email : sangharshachaaawaz22@gmail.com

Mob. : 7276871008 / 9665487134

# नरेंद्र मोदी यांनीच राजीनामा द्यावा; अश्या घोषणा आणि चर्चेला सुरूवात झाली; ही चर्चा आणि घोषणा मुख्य मागणी होण्याअगोदरच शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला हे वास्तव नाकारता येणार नाही

नीट प्रश्नपत्रिका फुटल्याच्या मुद्दयावरून कॉक्रोच जनता पार्टीने (सीजेपी) दिल्ली येथील जंतर- मंतर तसेच देशभरात विविध ठिकाणी तरुणांनी केलेल्या प्रखर आंदोलनाची धग वाढू लागल्यामुळे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी अखेर शनिवारी आपल्या पदाचा राजीनामा दिला. ते वृत्त ऐकताच आंदोलकांनी जंतर-मंतरवर जल्लोष केला. आता शिक्षणमंत्रिपदाचा पदभार केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

राजीनाम्यात धर्मेंद्र प्रधान म्हणाले, राजीनामा हा विषय मी काही वैयक्तिक प्रतिष्ठेचा प्रश्न केला नव्हता. मात्र, गेल्या १० दिवसांत घडलेल्या घटनांमुळे मी व्यथित झालो आहे. नीट प्रश्नपत्रिका फुटीची जबाबदारी मी पहिल्या दिवसापासून स्वीकारली आहे. जबाबदार पदांवर असलेल्या काही व्यक्तींनी विद्यार्थ्यांची दिशाभूल करून राजकीय फायद्यासाठी अडथळे केले याचे मला विलक्षण दुःख झाले.

देशभरातील परिस्थितीचा फायदा देशविरोधी शक्तींनी घेऊ यासाठी आपण सतर्क राहिले पाहिजे. शिक्षण क्षेत्रातील सुधारणांसाठी चार दशकांहून अधिक काळ आपण काम केले आणि देशाच्या आहे. युवक भवितव्यासाठी माझी बांधिलकी कायम आहे, असे प्रधान म्हणाले.

भारतात राजकीय पक्ष आंदोलनातून तयार होतात. परंतु, कॉकरोच जनता पार्टीचा (सीजेपी) जन्म मात्र १६ मे रोजी सोशल मीडियावर अचानक झाला होता. याची सुरुवात उपहासात्मक ऑनलाइन मोहिमेच्या रूपात झाली होती.

१५ मे रोजी एका खटल्याच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी याबाबत एक भाष्य केलं होतं. ते म्हणाले होते की, समाजात आधीच व्यवस्थेवर हल्ला करणारे काही परजीवी आहेत. तुम्हालाही त्यांच्यात सामील व्हायचं आहे का? काही तरुणांना रोजगार मिळत नाही किंवा करिअरमध्ये जागा मिळवू न शकल्याने ते कॉक्रोचसारखे (झुरळ) सगळीकडे पसरतात. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या या वक्तव्यावर मोठ्याप्रमाणात टीका झाली. या टीकेनंतर त्यांनी स्पष्टीकरण दिलं. आपलं वक्तव्य चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आलं असं त्यांनी म्हटलं. ते म्हणाले, १५ मे रोजी एका निरर्थक प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान केलेल्या माझ्या वक्तव्याचा प्रसारमाध्यमांतील एका गटाने चुकीचा अर्थ लावला, हे पाहून मला वाईट वाटलं. माझी टीका अशा लोकांवर होती, जे बनावट किंवा खोट्या पदव्यांच्या आधारावर वकिलीसारख्या क्षेत्रांत आले आहेत. असे लोक प्रसारमाध्यमं, सोशल मीडिया आणि इतर प्रतिष्ठित क्षेत्रांतही शिरले आहेत. त्यामुळे ते परजीवीसारखे आहेत.

पण तोपर्यंत 'कॉक्रोच' हा शब्द भारतातील राजकीय चर्चेचा भाग बनला होता. १६ मे रोजी ३० वर्षीय अभिजीत दिपके यांनी एक्सवर एक गुगल फॉर्म शेअर करून लोकांना कॉक्रोच जनता पार्टीत नोंदणी करण्याचं आवाहन केलं. अवघ्या काही तासांत अभिजीत यांना कित्येक हजारांहून अधिक नोंदणी मिळाल्या. इंटरनेटवर सुरू झालेला हा विनोद हळूहळू लोकांचा असंतोष, विनोद आणि राजकीय निराशा व्यक्त करणाऱ्या एका अनौपचारिक संस्थेत बदलला.

अभिजीत हा अमेरिकेतील बोस्टन युनिव्हर्सिटीमध्ये पब्लिक रिलेशन्समध्ये मास्टर्स करत होता. याच दरम्यान भारतामध्ये निट पेपरफुटी प्रकरण समोर आले. आणि या प्रकरणामध्ये जवळ-जवळ २३ विद्यार्थ्यांने आत्महत्या केल्या. या आत्महत्येला आणि परिक्षा पेपर लीक होण्याल्या केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना जबाबदार धरण्यात येवू लागले. या प्रकारचे सोशल मिडीयावर मोठ्या प्रमाणात प्रचार होत राहिला. आणि या विद्यार्थ्यांसाठी ठोस भूमिका घेण्यासाठी अभिजित दिपके भारतात आला. आंदोलनाला बसण्याच्या अगोदर त्यांनी कॉक्रोच हा तरुणांच्या नाराजीचा आवाज आहे. हे अगोदरच सांगितले होते. हे आंदोलन एकूण ३६ दिवसाचे झाले. ३६ व्या दिवशी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याचे दोन पानाचे पत्र सोशल मिडीयावर प्रसिध्द करण्यात आले. आणि संपूर्ण भारतात एकच जल्लोष करण्यात आला. या जल्लोषामध्येही अभिजित दिपके यांनी आंदोलनामध्ये सहभागी असणाऱ्या सर्व झेन झीनला विनंतीपुर्वक अन् भावूक होवून आग्रह केला की, आपण हा जल्लोष साजरा करत असताना या नीट पेपरफुटी झाल्यामुळे ज्या-ज्या विद्यार्थ्यांने आत्महत्या केली. त्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाला प्रत्येकी १ कोटी देण्यात येणार आहे. आणि आंदोलन चालू असताना दिल्ली पोलिसांनी ज्या पध्दतीने अमानुष पध्दतीने मारहाण केली त्यांच्यावर कारवाई होणार. तसेच या आंदोलनात सहभागी झालेल्या तरूण मुलामुलीवर तसेच इतरही नागरिक यां आंदोलनात सहभागी झाले होते. यांच्यावर दिल्ली पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. ते गुन्हे ताबडतोब मागे घेण्यात यावे. याही अटी मंजूर करण्यात आल्या आहेत. तसेच त्यांनी या आंदोलनाची दखल ही सरकारला घ्यावी लागली. कारण भारत देशातला तरूण एकवटला होता. त्यांनी भारताचे भविष्य म्हणून ज्याच्या खांद्यावर जबाबदारी आहे. अशा तरूण मुलां-मुलींना जर सरकारने चुकीच्या पध्दतीने वागणूक दिली तर हा तरूण मागे हटत नाही. हे दाखवून दिले आहे. या आंदोलनामध्ये विशेष बाब म्हणून उल्लेख करावा लागेल की, पेपरफुटी प्रकरणामुळे शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी दिल्ली येथील जंतर-मंतर मैदानावर बेमुद्दत धरणे आंदोलन चालू होते. दि.२० जुलै रोजी हे आंदोलन संसदेला आपल्या मागण्या घेवून जाणार होते. पण त्याचवेळेस दिल्लीतील पोलिसांनी विद्यार्थी मुलां-मुलींवर बेछुट लाठीमार केला. याने भारतातली मेन प्रसारमाध्यमे यांनी काही प्रमाणात सत्य परिस्थिती दाखविण्याचा प्रयत्न केला. पण सोशल मिडीयाच्या माध्यमातून संपूर्ण जगानेच जतंर-मंतर येथील पोलिसांकडून कशापध्दतीने विद्यार्थ्यांना अमानुषपणे मारहाण होत आहे. हे दिसल्याने भारतातील प्रत्येक राज्यात आणि राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात अन् शहरात आणि त्याचबरोबर तालुका गाव पातळीवरसुध्दा मोठ्या प्रमाणात भाजप व त्यांचे सहकारी मित्र पक्ष सोडून सर्व पक्षानी या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. या पाठिंब्याच्या बरोबरच प्रत्येक शहरात आणि जिल्ह्यात व तालुका गावपातळीवर रस्त्यावर आंदोलने होवू लागली. ह्या आंदोलनाने मोठे स्वरूप घेतले. शहराच्या शहरे विद्यार्थ्यांने एकत्र येत मोठे स्वरूप या आंदेलनाला देण्यात आले. आणि महत्वाचा मुद्दा चालू झाला तो म्हणजे. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा मागणारे विद्यार्थी आणि त्यांचे पालक रस्त्यावर आंदोलनात एकत्र येवून आता नरेंद्र मोदी यांनीच राजीनामा द्यावा. अश्या घोषणा आणि चर्चेला सुरूवात झाली. ही चर्चा आणि ही घोषणा मुख्य मागणी होण्याअगोदरच शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनाम द्यावा लागला. हे वास्तव नाकारता येणार नाही. आजही सोशल मिडीयावर मोठ्या प्रमाणामध्ये भारतातील कानाकोपऱ्यातून या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी ज्या रॅली, आंदोलने झाली. यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये विद्यार्थ्यांसह सहभागी झालेल्या पालकांनी हे मान्य केले की, आम्ही केलेल्या चुकीची फळे ही आमच्या लेकरांना मिळत आहे. हे आंदोलन निमित्त म्हणून असले तरी या देशामध्ये सर्वसामान्य माणूस हा महागाई बेराजगारी, कर्मबाजारी, रोगराई, वैद्यकीय उपचार, शालेय शिक्षण, आणि केंद्र सरकारची होत असलेली सर्वच स्तरावर खाजगीकरणाला पुर्ण वैतागली होती. त्यांना व्यक्त करण्याचे फक्त माध्यम हवे होते. ते या कॉक्रोच जनता पार्टीच्या माध्यमातून उपलब्ध झाल्याने भारतातील मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांसह पालक, ज्येष्ठ नागरिक, शिक्षक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, सेवानिवृत्त सैनिक यामध्ये सर्वात महत्वाचे तृतीयपंथी बांधवांनी मोठ्या प्रमाणात या आंदोलनाला पाठिंबा देवून या सरकारला शिव्या श्राप दिल्या. हे साऱ्या जगाने पाहिले आहे. म्हणून शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या घोषणेनंतर दुसऱ्या दिवशी सांयकाळी ६ च्या दरम्यान मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांना अभिवादन करण्यासाठी संपूर्ण भारतात कॅन्डल मार्च काढावा. असे अभिजित दिपके यांनी सांगितले आहे.

# पुणे महापालिकेचे स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली मान्यता


## सुक्या कचऱ्याच्या वाहतूक व प्रक्रियेसाठी ६.८३ कोटींच्या ठेक्याच्या प्रस्तावाला मान्यता

**पुणे :** शहरात दररोज निर्माण होणाऱ्या किमान ३०० मेट्रिक टन सुक्या कचऱ्याच्या संकलन, वाहतूक आणि सिमेंट उद्योगांमध्ये शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रियेसाठी पुणे महापालिकेने ६ कोटी ८३ लाख ६४ हजार रुपयांचा ठेका देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता, या प्रस्तावाला मान्यता दिल्याचे समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले.

या कामासाठी मे. भूमी ग्रीन एनर्जी एनव्हारोकेअर एलएलपी या संस्थेची निवड करण्यात आली असून, प्रति मेट्रिक टन ८४४ रुपये दराने काम करण्याची शिफारस प्रशासनाने केली आहे.

रॅम्प, ट्रान्सफर स्टेशन किंवा महापालिकेने निश्चित केलेल्या अन्य ठिकाणांहून दररोज किमान ३०० मेट्रिक टन सुक्या कचऱ्याचे संकलन करून तो सिमेंट उद्योगांपर्यंत पोहोचविणे आणि त्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करणे अपेक्षित आहे. हा करार सहा महिन्यांसाठी असून आवश्यकतेनुसार पुढील तीन महिन्यांची मुदतवाढ देण्याची तरतूद आहे. या कालावधीत एकूण ८१ हजार मेट्रिक टन कचऱ्याची वाहतूक व प्रक्रिया केली जाणार आहे.

महापालिका आयुक्तांनी ९ जून २०२६ रोजी या कामास प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली. पहिल्या टप्प्यात केवळ एकच निविदा प्राप्त झाल्याने फेरनिविदा मागविण्यात आली. फेरनिविदेनंतरही मे. भूमी ग्रीन एनर्जी एनव्हारोकेअर एलएलपी या संस्थेचीच एकमेव पात्र निविदा प्राप्त झाली. त्यानंतर आवश्यक कागदपत्रांची छाननी करून २५ जून रोजी व्यापारी लिफाफा उघडण्यात आला. निविदा समितीने २९ जून रोजी संबंधित दरास मान्यता दिली.



या कामासाठी ६ कोटी ८३ लाख ६४ हजार रुपये (जीएसटी वगळून) खर्च अपेक्षित आहे. हा खर्च घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या समाविष्ट गावे सुस, महाळुंगे, बावधन, कोंढवे धावडे येथील प्रकल्प, सिमेंट कंपनी व कात्रज येथील एक्सेल कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी टिपिंग फी अदा करणे या अर्थशीर्षाखालील निधीतून करण्यात येणार आहे. या अर्थशीर्षाखाली सन २०२६-२७ मध्ये ८.५ कोटी रुपयांची तरतूद असून, आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधी वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे.

प्रशासनाने हे काम अत्यावश्यक स्वरूपाचे असल्याचे नमूद करत १ जुलै २०२६ पासून काम सुरू करून घेण्यास तसेच संबंधित संस्थेशी करार करण्यासाठी स्थायी समितीची मंजुरी मागितली आहे. प्रस्तावाला स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानंतर संबंधित संस्थेकडून प्रत्यक्ष काम हाती घेतले जाणार आहे.

## दळवी रुग्णालयात विशेष दिव्यांगांसाठी थेरपी सेंटर; 'लायन्स क्लब ऑफ पूना आय फाउंडेशन'ची निवड

**पुणे :** पुणे महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने शिवाजीनगर येथील डॉ. दळवी रुग्णालयात विशेष दिव्यांगांसाठी सर्वसमावेशक थेरपी सेंटर सुरू करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून, हा उपक्रम राबविण्यासाठी लायन्स क्लब ऑफ पूना आय फाउंडेशन या संस्थेची निवड करण्याचा प्रस्तावाला स्थायी समितीने मान्यता दिली. मुख्य सभेसमोर मंजुरीसाठी ठेवण्यात आला येणार आहे. या केंद्रामध्ये दिव्यांगांसाठी विविध प्रकारच्या थेरपी, उपचार आणि समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले. तसेच हा उपक्रम विभागाच्या सूचनेनुसार सूर राहणार असल्याचेही ते म्हणाले.

महापालिका आयुक्तांच्या ८ डिसेंबर २०२५ रोजीच्या मंजुरीनंतर समाज विकास विभागाने ५ डिसेंबर २०२५ रोजी अनुभवी सेवाभावी संस्थांकडून प्रस्ताव मागविले होते. त्यास दोन संस्थांनी प्रतिसाद दिला. लायन्स क्लब ऑफ पूना आय फाउंडेशन आणि स्फेरूल फाउंडेशन या संस्थांचे प्रस्ताव प्राप्त झाले. प्रस्तावांची छाननी केल्यानंतर लायन्स क्लब ऑफ पूना आय फाउंडेशनने आवश्यक सर्व कागदपत्रे सादर केल्याचे, तसेच दिव्यांग, आरोग्य, शिक्षण, पुनर्वसन आणि सामाजिक विकास क्षेत्रात अनेक वर्षांचा अनुभव असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

दुसरीकडे, स्फेरूल फाउंडेशनकडून आवश्यक नोंदणी प्रमाणपत्र आणि जाहिरातीनुसार अपेक्षित कागदपत्रे सादर करण्यात आली नसल्याचे, तसेच दिव्यांग क्षेत्रातील आवश्यक अनुभवही नसल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. त्यामुळे अनुभवी संस्था म्हणून लायन्स क्लब ऑफ पूना आय फाउंडेशनची निवड करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

प्रस्तावानुसार केंद्रामध्ये बालरोग मज्जासंस्था सल्ला, मानसिक मूल्यांकन, स्पीच थेरपी, व्यावसायिक थेरपी, फिजिओथेरपी, वर्तन सुधारणा थेरपी, आनुवंशिक सल्ला, ऑडिओलॉजिकल चाचण्या, पीटीए, विशेष शिक्षण, उपचारात्मक थेरपी, बेरा आणि ईईजी अशा एकूण १३ सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या सेवांसाठी २०० रुपयांपासून १,२०० रुपयांपर्यंत जीएसटीसह शुल्क निश्चित करण्याचा प्रस्ताव आहे.

भविष्यात दिव्यांग विद्यार्थ्यांना किंवा रुग्णांना आणखी उपचार पद्धतींची आवश्यकता भासल्यास आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनानुसार नवीन थेरपी सुरू करण्यास आणि त्यांचे दर महापालिका आयुक्तांच्या मंजुरीने निश्चित करण्याची तरतूदही प्रस्तावात करण्यात आली आहे. केंद्राचे दैनंदिन व्यवस्थापन, स्वच्छता, उपकरणांची देखभाल आणि थेरपी सेवा संबंधित संस्था स्वतःच्या खर्चाने चालविणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे, पुणे महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थी तसेच महापालिकेच्या रुग्णालयांतून संदर्भित करण्यात आलेल्या रुग्णांकडून प्रस्तावित शुल्काच्या केवळ ५० टक्के रक्कम आकारण्यात येणार आहे. उर्वरित खर्च महापालिकेच्या दिव्यांग कल्याणकारी योजनेअंतर्गत संबंधित अर्थशीर्षातून अदा करण्यात येणार असल्याचे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे.



# श्रवण व्यवहारे याची कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया कामगार हितरक्षक संघाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे यशस्वीरीत्या पूर्ण झाली

## पुणे महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते ॲड. निलेश निकम यांनी व्यवहारे कुटुंबाला दिली भेट

**पुणे :** एका खासगी कंपनीत काम करणारा वैभव व्यवहारे या कंत्राटी कामगारांच्या लहान मुलाला ऐकणे आणि बोलण्यास जन्मत: येत नव्हते. त्यासाठी जवळ-जवळ लाखो रूपयांचा खर्च देण्यात आला होता. पण या कामगाराला एवढा खर्च झेपत नसल्याने तो चिंतेत होता त्यावेळी त्या कामगाराला पुणे महापालिकेच्या कंत्राटी कामगाराने कामगार हितरक्षक संघ महाराष्ट्र राज्य यांच्याकडून वैद्यकीय उपचार मिळवून घेतलेबाबत माहिती दिल्यावर त्या कंपनीतील कामगाराने शरद भाकरे यांच्याशी संपर्क केला. आणि पुढे या वैभव व्यवहारेच्या लहान मुलाला श्रवणला उपचार मिळवून देण्याकरिता शरद भाकरे यांनी संबंधित कंपनीच्या अधिकारी यांच्याशी संपर्क साधून त्यांनी संबंधित कंत्राटी कामगाराच्या कागदपत्रे जमा करण्यापासून ते कुटुंबातील सदस्यांची नावे टाकण्यापर्यंत आणि हॉस्पिटलमध्ये उपचार करून घेवूपर्यंत शरद भाकरे यांनी



पाठपुरावा केला नुकतेच पुणे महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते ॲड.निलेश निकम यांनी आपल्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून श्रवण वैभव व्यवहारे यांच्या नांदेड सिटी येथील निवासस्थानी भेट देऊन त्यांची व त्यांच्या कुटुंबीयांची आस्थेने विचारपूस केली. आणि श्रवणला भेटून त्याला आशीर्वाद व शुभेच्छा दिल्या.

श्रवण व्यवहारे यांची कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया कामगार हितरक्षक संघाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे यशस्वीरीत्या पूर्ण झाली. याबद्दल श्रवणच्या कुटुंबीयांनी संघटनेप्रती मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी ॲड.निलेश निकम यांनी कामगार हितरक्षक संघाचे अध्यक्ष तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. हा सन्मान संपूर्ण संघटनेच्या कार्याची दखल असून, कामगार व गरजू नागरिकांच्या सेवेसाठी अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा देणारा आहे. असे शरद भाकरे म्हणाले.

## श्रवणची आई प्रतीक्षा व्यवहारे यांनी आभार व्यक्त केले

माझा मुलगा श्रवण वैभव व्यवहारे याला दोन्ही कानानी जन्मतः ऐकायला येत नसल्यामुळे ते बोलू शकत नव्हता याचे नुकतेच कॉक्लिअर **implant** सर्जरी झाली आणि माझ्या मुलाला ऐकण्यासाठी पुन्हा एकदा पुनर्जन्मच झाला आहे आज..याचे सर्व श्रेय शरद भाऊ भाकरे सर आणि मनीष भाई शेठ सर मुंबई यांना जाते.. या दोघामुळेच आज माझ्या चिमुकल्या जीवाला या २ देव माणसामुळे ऐकण्यासाठी नवीन जीवनदानच मिळाले आहे..यासाठी मी एक आई म्हणून शरद भाऊ भाकरे आणि मनीष भाई शेठ यांची आजन्म उपकार विसरणार नाही... आणि त्यांची आजन्म ऋणी राहीन. या दोघांच्या अथक कायदेशीर लढाई मुळे माझ्या



मुलाला ऐकण्यासाठी नवीन जीवनदानच मिळाले त्याबद्दल मी आई म्हणून खूप खूप आभारी आहे. शरद भाऊ भाकरे सर आणि मनीष भाई शेठ सर या दोघांच्या प्रयत्नामुळे असेच मोलाचे कार्य घडवून आणू आणि या दोघांना असच आमच्या सर्वांचे आशीर्वाद, प्रेम आणि उदंड आयुष्य मिळो हीच समर्थ चरणी प्रार्थना.

# आजी-माजी नगरसेवकांसह कुटुंबीयांनाही वैद्यकीय योजनेचा कायमस्वरूपी लाभ तर दुसरीकडे कंत्राटी कामगार वैद्यकीय उपचाराविना मरत आहे; याला जबाबदार कोण?

**(पान १ वरून)** पुणे महापालिकेतील कंत्राटी कामगारांना वैद्यकीय उपचार मिळणून देण्याकरिता कित्येकवेळा ठेकेदार, अधिकारी यांच्याशी वाद घालावा लागला आहे. तर कित्येक विषयामध्ये पुणे महापालिकेचे महापौर मंजुषाताई नागपुरे यांच्याकडे जावून सविस्तर चर्चा केल्यावर त्या-त्या विषयाची महापौर मंजुषाताई नागपुरे यांनी गंभीर दखल घेवून शरद भाकरे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिल्याचे सांगितले आहे. पण प्रत्येकवेळी महापौरांकडे न जाताही कामगार हितरक्षक संघाच्या वतीने कंत्राटी कामगारांना मोठ्या प्रमाणात वैद्यकीय उपचार मिळवून देण्याबरोबरच कंत्राटी कामगारांना वेळेवर वेतन मिळविण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर वादही घालवा लागत असल्याचे शरद भाकरे यांनी सांगितले. तसेच पुढे त्यांनी माहिती दिली की, पुणे महानगरपालिकेतर्फे कंत्राटी कामगारांना किमान वेतन, ईएसआय, ईपीएफ, कामगार कल्याण निधी आणि इतर सुविधा मिळण्यासाठी कार्यालयीन परिपत्रक काढल्या जाते. यामध्ये किती प्रमाणात याची अंमलबजावणी होते हे आजतगायत कार्यालयीन परिपत्रक काढणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांने आढावा घेतलेला नाही. याचे जीवंत उदाहरण म्हणून त्यांनी अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) पुणे महानगरपालिका, जावक क्र.अतिमआ(ज)/एलओ/३२ दि.०२/४/२०२५ रोजी कार्यालय परिपत्रक काढण्यात आले. यामध्ये पुणे महापालिकेत बाह्यस्रोताव्दारे सेवा घेण्यात येत असलेल्या कंत्राटी कामगारांना राज्य कामगार विमा योजनेचे ई-पहचान पत्र (ईएसआय कार्ड) वितरित झाले असल्याबाबत खातरजमा करणेबाबत म्हणून पुणे महानगरपालिकेमधील विविध विकास प्रकल्प, देखभाल दुरूस्ती व स्वच्छतेची कामे बाह्यस्रोताव्दारे कंत्राटी कामगारांची सेवा घेवून करण्यात येत आहे. या कंत्राटी कामगारांच्या बाबतीत कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० मधील तरतुदी व राज्य कामगार विमा अधिनियम १९४८ मधील तरतुदींची परिणामकारक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. याअंतर्गत कंत्राटी कामगारांच्या विमा शुल्काचा हिस्सा व कंत्राटदाराच्या हिश्याचा भरणा सदर प्राधिकरणाकडे विहित दराने नियमितपणे होण आवश्यक आहे. तसेच कंत्राटी कामगारांना व त्यांच्या कुटुबियांना राज्य कामगार विमा अंतर्गत वेळोवेळी वैद्यकीय सेवा मिळणेकरीता त्यांच्या कुटुंबाचा संपूर्ण तपशील असलेले ई-पहचान पत्र वितरीत करणे आवश्यक आहे. परंतु ई-पहचान पत्र वितरीत न केल्याने किंवा ई-पहचान पत्रातील तपशील अपूर्ण असल्याने काही कंत्राटी कामगारांना वैद्यकीय सुविधेपासून वंचित राहावे लागत आहे, अशा स्वरूपाच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.

उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने कंत्राटी कामगारांच्या ई-पहचान पत्रासंदर्भात पुढीलप्रमाणे काटेकोरपणे कार्यवाही करण्यात यावी.

१) पुणे महानगरपलिकेतील ज्या विभागात कंत्राटी कामगारांची सेवा घेतली जात आहे त्या विभागातील पर्यवेक्षकीय अधिकारी (उदा.उप अभियंता, कनिष्ठ अभियंता, विभागीय आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक इत्यादी) यांनी त्यांच्याकडील कार्यरत कंत्राटी कामगारांना ई-पहचान पत्र वितरीत झाले असलेबाबत विशेष मोहीम राबवून वैयक्तिक आढावा घ्यावा.

२) कंत्राटी कामगारांकडील ई-पहचान पत्राचा आढावा घेताना सदर ई-पहचान पत्रामध्ये कामगारांच्या संपूर्ण कुटुंबाचा तपशील अचूकपणे नमूद करण्यात आला आहे का याबाबतची तपासणी करावी.

३) सदर ई-पहचान पत्रावर कंत्राटी कामगाराचे कुटूंबियांसह छायाचित्र लावण्यात आले आहे का? तसेच पर्यवेक्षकीय अधिकारी व राज्य विमा विभागाचे अधिकारी यांनी ते साक्षांकित केले आहे का याबाबत खातरजमा करण्यात यावी.

४) एखाद्या कंत्राटी कामगारास ई-पहचान पत्र दिले गेले नसल्यास किंवा ई-पहचान पत्रातील तपशील अपूर्ण असल्यास संबंधित ठेकेदारास समक्ष सूचना देवून त्याची पूर्तता करून घ्यावी. ही पूर्तता करून घेण्याची जबाबदारी संबंधित पर्यवेक्षकीय अधिकारी यांची व्यक्तीश: राहील याची नोंद घ्यावी.

५) ठेकेदाराचे देयक अदा करण्यापूर्वी संबंधित ठेकेदाराने ईएसआयचा भरणा राज्य विमा विभागाकडे विहित दराने केला आहे का तसेच संबंधित कंत्राटी कामगारांना ई-पहचान पत्र वितरीत केले गेले आहे का याबाबत खातरजमा करूनच देयक अदा करण्याची कार्यवाही करावी.

६) कामगार कल्याण विभागाकडे अभिप्रायासाठी प्रकरण पाठविताना त्यासोबत सर्व कंत्राटी कामगारांना संपूर्ण तपशिलासह ई-पहचान पत्र वितरीत केले असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे यापुढे अनिवार्य राहील.

ई-पहचान पत्र प्राप्त न झाल्याने किंवा त्यामधील कुटुंबाचा तपशील किंवा अन्य माहिती अपूर्ण असल्याने कोणताही कंत्राटी कर्मचारी राज्य कामगार विमा विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय सुविधांपासून वंचित राहिल्यास संबंधित विभागातील पर्यवेक्षकीय अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल याची सर्व संबंधित अधिकारी यांनी नोंद घ्यावी. असे असतानाही पुन्हा अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) पुणे महानगरपालिका जावक क्र.१७०४ दि.२१/६/२०२५ रोजी पुणे महानगरपालिकेतील कंत्राटी कामगारांना कुटूंबांच्या माहितीसह ई-पहचान पत्र वितरित करणेबाबत महत्वाचे म्हणून कार्यालयीन परिपत्रक काढण्यात आले त्यानंतर पुन्हा एकदा अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) पुणे महानगरपालिका जावक क्र.अतिमआ(ज)/एलओ/७२८२ दि.५/१/२०२६ रोजी पुणे महापालिकेतील बाह्यस्रोतामार्फत सेवा घेण्यात येणाऱ्या कंत्राटी कामगारांना कर्मचारी राज्य विमा अधिनियम १९४८ मधील तरतुदी लागू करणेबाबत कार्यालयीन परिपत्रक काढण्यात आले. पुणे महापालिकेकडून अशा प्रकारे फक्त आणि फक्त कार्यालयीन परिपत्रकच काढण्यात येतात. पण याची अंमलबजावणी करून घेण्याची ना सत्ताधारी ना विरोधक कोणीही पुढे येताना दिसत नाही? पण पुणे महापालिकेचे आजी-माजी नगरसेवक, शिक्षण मंडळाचे आजी-माजी सदस्य तसेच पुणे महानगरपरिवहन महामंडळ (पीएमपीएमएल) च्या आजी-माजी सदस्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना महापालिकेच्या अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेचा कायमस्वरूपी लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशी माहिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी काही दिवसापुर्वी या निर्णयाची माहिती दिली. महापालिकेच्या नगरसचिव कार्यालयाकडून यासंबंधीचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. सध्या महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना राबविण्यात येते. या योजनेची व्याप्ती वाढवून आजी-माजी नगरसेवक, शिक्षण मंडळाचे आजी-माजी सदस्य, पीएमपीएमएलचे आजी-माजी सदस्य तसेच त्यांच्या पती किंवा पत्नी आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या दिव्यांग अपत्यांनाही या योजनेत समाविष्ट करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे पात्र लाभार्थ्यांना महापालिकेच्या वैद्यकीय सहाय्य योजनेअंतर्गत उपचारांसाठी आर्थिक मदत मिळणार आहे. विशेषत: हृदयरोग, कर्करोग, शस्त्रक्रिया किंवा इतर गंभीर आजारांच्या उपचारांवर होणारा मोठा खर्च कमी करण्यासाठी या योजनेचा आधार मिळू शकतो. निवृत्तीनंतर नियमित वैद्यकीय सुविधांचा अभाव भासत असलेल्या आजी-माजी लोकप्रतिनिधींना तसेच त्यांच्या पात्र कुटुंबीयांना उपचारासाठी आर्थिक संरक्षण उपलब्ध होणार आहे. वाढत्या आरोग्य खर्चाच्या पार्श्वभूमीवर उपचारासाठी आर्थिक मदत मिळाल्याने वैद्यकीय सेवांचा लाभ घेणे सुलभ होईल, असा विश्वास महापालिका प्रशासनाने व्यक्त केला आहे.

पुणेकरांच्या कररूपी पैशातून माननीयांचे हित जोपासण्याचे काम सत्ताधारी आणि विरोधक यांनी एकत्र येऊन केले आहे.

शहराच्या विकासात, लोकसेवेत आणि प्रशासकीय कामकाजात योगदान दिलेल्या आजी-माजी लोकप्रतिनिधींना वाढत्या वैद्यकीय खर्चाच्या पार्श्वभूमीवर आरोग्यविषयक संरक्षण उपलब्ध करून देण्याची गरज व्यक्त करण्यात आली होती. त्यानुसार या प्रस्तावाला स्थायी समितीने मान्यता दिली. याचे स्वागतच आहे. पण पुणे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांनी काढलेल्या कार्यालयीन परिपत्रकानुसार कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केव्हा होणार आणि कंत्राटी कामगारांना वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधक पुढे येणार का? हा महत्वाचा प्रश्न आहे. कारण आजही पुणे शहरात कित्येक कामगारांना ईएसआय कार्ड नसल्यामुळे मोफत उपचार मिळत नाही. त्यांना आजही खाजगी हॉस्पिटल किंवा स्थानिक स्तरावरील छोटे-मोठे दवाखाने, सरकारी हॉस्पिटल येथे उपचारासाठी कर्जबाजारी होवून उपचार घ्यावा लागत आहे. याकडे सत्ताधारीसह विरोधकांनी दुर्लक्ष करू नये कारण तुम्हाला कायमस्वरूपी वैद्यकीय योजनेचा लाभ मिळणार आहे. आता या कंत्राटी कामगारांचा विचार करा आणि पुढे या.

# अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण जातीय जनगणनेनंतरच करावे ; मागणीसाठी रिपब्लिकन पक्षाचा सोमवारी महामोर्चा

**पुणे / प्रतिनिधी :** अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करण्याचा निर्णय राष्ट्रीय जातीय जनगणनेतील अचूक लोकसंख्येच्या आकडेवारीनंतरच घ्यावा, अन्यथा समाजात अंतर्गत फूट पडण्याची शक्यता असून अनेक समाजघटकांवर अन्याय होऊ शकतो, अशी भूमिका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) यांनी मांडली आहे. या मागणीसाठी सोमवार, २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील पुतळ्यापासून भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पक्षाचे पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर आणि प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुणे श्रमिक पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेला पक्षाचे सरचिटणीस महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, मोहन जगताप, निलेश रोकडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी संजय सोनवणे म्हणाले की, अनुसूचित जातींतील ५९ समाजघटकांमध्ये सामाजिक ऐक्य टिकवून ठेवणे ही रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)ची ठाम भूमिका आहे. उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेमुळे कोणत्याही




समाजघटकात मतभेद किंवा दुरावा निर्माण होऊ नये, यासाठी ती प्रक्रिया राष्ट्रीय जातीय जनगणना पूर्ण झाल्यानंतरच राबविण्यात यावी. जनगणनेतील लोकसंख्येच्या अचूक आकडेवारीच्या आधारेच न्याय्य निर्णय घेणे शक्य असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमहापौर परशुराम वाडेकर म्हणाले की, अनुसूचित जातींतील विविध समाजघटकांनी सामाजिक न्याय, समान हक्क आणि आरक्षणासाठी अनेक दशकांपासून एकत्रितपणे संघर्ष केला आहे. त्यामुळे कोणताही निर्णय घाईघाईने घेण्याऐवजी वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे घेणे आवश्यक आहे. प्रत्येक जातीची अचूक लोकसंख्या जनगणनेतून समोर आल्यानंतरच उपवर्गीकरणाबाबत धोरण निश्चित केल्यास सर्व समाजघटकांना न्याय मिळू शकेल. राज्यातील उर्वरित ५८ अनुसूचित जातींनाही शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये समान संधी मिळाव्यात, ही पक्षाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच २०२७ च्या जनगणनेनंतर लोकसंख्येच्या प्रमाणानुसार आरक्षणाच्या रचनेचाही पुनर्विचार करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली.

प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव म्हणाले की, अनुसूचित जातींमध्ये एकूण ५९ जातींचा समावेश असून उपवर्गीकरणाच्या विषयावर समाजात तणावाचे वातावरण निर्माण होत आहे. या प्रक्रियेमुळे समाजात अंतर्गत गटबाजी आणि फूट पडण्याची शक्यता असल्याने पक्षाचा प्राथमिक स्तरावर त्यास विरोध आहे. मात्र, भविष्यात उपवर्गीकरण

अपरिहार्य ठरल्यास ते सरसकट न करता राष्ट्रीय जातीय जनगणनेतील अधिकृत लोकसंख्येच्या आकडेवारीच्या आधारेच करण्यात यावे. जनगणनेचे अंतिम अहवाल येण्यापूर्वी कोणताही निर्णय घेतल्यास अनेक वंचित समाजघटकांवर अन्याय होण्याची शक्यता असल्याने केंद्र आणि राज्य सरकारने जनगणनेनंतरच ही प्रक्रिया राबवावी, अशी मागणी त्यांनी केली.










# दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याचा खडकवासला महाविकास आघाडीकडून तीव्र निषेध; केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी

**पुणे/प्रतिनीधी :** दिल्ली येथे शैक्षणिक मागण्यांसाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ खडकवासला विधानसभा मतदारसंघ महाविकास आघाडीच्या वतीने नुकतेच सिंहगड रस्त्यावरील ह.भ.प. पांडुरंगशास्त्री आठवले चौक येथे शांततापूर्ण आंदोलन करण्यात आले. या आंदोलनातून विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाईचा तीव्र निषेध नोंदविण्यात आला असून, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.




आंदोलनादरम्यान महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेवर टीका करत विद्यार्थ्यांच्या लोकशाही हक्कांचे संरक्षण करण्याची मागणी केली. विद्यार्थ्यांवर लाठीमार करण्याचे आदेश देणाऱ्या तसेच त्याची अंमलबजावणी करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली.

यावेळी उपस्थित नेत्यांनी सांगितले की, लोकशाही व्यवस्थेत विद्यार्थ्यांना आपल्या प्रश्नांसाठी शांततापूर्ण आंदोलन करण्याचा घटनात्मक अधिकार आहे. त्यांच्या मागण्यांवर संवाद साधण्याऐवजी त्यांच्यावर बळाचा वापर करणे हे लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचवणारे आहे. विद्यार्थ्यांचा आवाज दडपण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही. दिल्लीतील या घटनेचे पडसाद देशभर उमटत असून, त्याविरोधात खडकवासला विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीने आंदोलन करून विद्यार्थ्यांच्या लढ्याला जाहीर पाठिंबा दर्शविला. यावेळी माजी आमदार मोहन जोशी, काँग्रेसच्या अध्यक्षा दीप्ती चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे पुणे महानगरपालिकेतील गटनेते तथा नगरसेवक सोपान ऊर्फ काकासाहेब चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या महिला शहराध्यक्ष स्वाती पोकळे, अनिता इंगळे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खडकवासला विधानसभा अध्यक्ष शिवाजी मते, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे विधानसभा अध्यक्ष संदीप मते, काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष सुरेश मते, काँग्रेस पक्षाचे संघटक मिलिंद पोकळे, राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष रुपेश घुले, अनिकेत चव्हाण, शरद दबडे यांच्यासह शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे खडकवासला विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी, महिला आघाडी, युवक संघटनांचे प्रतिनिधी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# सोनम वांगचुक यांच्या अटकेच्या निषेधार्थ शिवाजीनगर न्यायालयात वकिलांचे जोरदार आंदोलन

**पुणे :** लडाखचे पर्यावरणवादी नेते सोनम वांगचुक यांना केंद्र सरकारने पोलिसांच्या बळाचा वापर करून ज्या पद्धतीने बेकायदेशीरपणे उचलून नेले, त्या दडपशाहीचा निषेध करण्यासाठी संविधान रक्षक वकील फोरम'च्या वतीने नुकतेच जिल्हा न्यायालय, शिवाजीनगर (गेट नंबर ४) येथे जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे न्यायालय परिसर दणाणून गेला होता.




आंदोलक वकिलांनी केंद्र सरकारच्या दडपशाही धोरणाविरोधात आणि 'नीट' (NEET) पेपरफुटी प्रकरणावरून धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या, पंतप्रधान नरेंद्र मोदी राजीनामा द्या आणि सोनम वांगचुक आप संघर्ष करो, हम तुम्हारे साथ है अशा तीव्र घोषणा दिल्या.

संविधान रक्षक वकील फोरमचे अध्यक्ष ॲड. मोहन वाडेकर यांनी केंद्र सरकारवर घणाघाती टीका केली. ते म्हणाले, सरकारने सोनम वांगचुक यांच्या २० दिवसांच्या प्राणांतिक उपोषणाकडे आणि ढासळत्या तब्येतीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. सोनम वांगचुक आणि त्यांच्यासोबतच्या विद्यार्थ्यांनी 'नीट' पेपरफुटी विरोधात जे आंदोलन केले होते, त्यात केंद्र सरकारला उपोषणकर्त्या सोनम वांगचुक व विद्यार्थ्यांचे बळी घ्यायचे होते का? शेतकऱ्यांच्या आंदोलनापासून ते जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनापर्यंत हे सरकार अतिशय असंवेदनशील आणि क्रूर पद्धतीने आंदोलनकर्त्यांशी वागत आहे. केंद्र सरकारचे हे वागणे पूर्णपणे असंविधानिक आणि घटनात्मक मूल्यांची पायमल्ली करणारे असून, आम्ही संविधान रक्षक फोरमचे वकील याचा तीव्र निषेध करतो.

या प्रसंगी संघटनेचे ज्येष्ठ विधीज्ज्ञ ॲड.शाहिद अख्तर, ॲड.नीलिमा वर्तक, ॲड.एकनाथ सुगावकर, ॲड.लक्ष्मण राणे, एडवोकेट किरण कदम, एडवोकेट फैय्याज शेख, एडवोकेट नाथा शिंगाडे एडवोकेट श्रीकांत अगस्ते आणि महेश देशमुख यांनीही आपल्या भाषणातून केंद्र सरकारच्या असंवेदनशील कृतीचा जाहीर निषेध केला.

या आंदोलनादरम्यान 'नीट' परीक्षा घोटाळ्यामुळे आणि मानसिक त्रासामुळे आत्महत्या कराव्या लागलेल्या २३ निष्पाप विद्यार्थ्यांना संविधान रक्षक वकील फोरमच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. शारदा वाडेकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार ॲड.निखिल गडकर यांनी मानले. या आंदोलनाला शिवाजीनगर न्यायालयातील तरुण आणि ज्येष्ठ वकिल मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलन संपल्यानंतर माननीय जिल्हाधिकारी यांना संविधान रक्षक वकील फोरम पुणे यांचे तर्फे निवेदन ज्येष्ठविधीज्ञ एडवोकेट नाथा शिंगाडे एडवोकेट तौफिक शेख एडवोकेट कुंभारकर एडवोकेट अमित पाडळे एडवोकेट श्वेता कुंभारकर यांनी दिले










## सा.संघर्षाचा आवाज च्या १३ व्या वर्धापनदिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा

*शुभेच्छुक*

मा.नंदिनी सिध्दार्थ धेंडे
नगरसेविका, पुणे महानगरपालिका

डॉ.सिध्दार्थ धेंडे, मा.उपमहापौर,
पुणे महानगरपालिका




## सा.संघर्षाचा आवाज च्या तेराव्या वर्धापनदिनानिमित्त

*शुभेच्छुक*

हार्दिक शुभेच्छा..!

मा.अश्विनीताई भंडारे, नगरसेविका, पुणे मनपा
सदस्य नाव समिती, पुणे महानगरपालिका

मा.राहुल आप्पा भंडारे, मा.नगरसेवक, पुणे मनपा
सरचिटणीस-भाजपा, पुणे शहर




## सा. संघर्षाचा आवाज च्या तेराव्या वर्धापनदिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

मा. रविंद्र भोसले, अध्यक्ष सु.बे.आ

## सा. संघर्षाचा आवाज च्या तेराव्या वर्धापनदिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

एस.वि.कार्लेकर ॲन्ड असोसिएट्स
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर

## सा. संघर्षाचा आवाज च्या १३ वर्धापनदिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा..!

शुभेच्छुक

मे.जे.आर.जगताप ॲन्ड कंपनी
सिव्हिल गव्हर्मेन्ट कॉन्ट्रॅक्टर तालुका इंदापूर, जिल्हा पुणे

## सा. संघर्षाचा आवाज च्या १३ व्या वर्धापनदिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा

*शुभेच्छुक*

इंजि. विलास सुर्यवंशी,
अध्यक्ष, पुणे शहर
अध्यक्ष-बहुजन सार्वजनिक बांधकाम कॉन्ट्रक्टर्स
असोसिएशन पुणे विभाग


सा.संघर्षाचा आवाज च्या
१३ व्या वर्धापनदिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
*शुभेच्छुक*
मा.परशुराम वाडेकर
उपमहापौर, पुणे महानगरपालिका
मा.सुनिता परशुराम वाडेकर
मा.उपमहापौर, पुणे महानगरपालिका


सा.संघर्षाचा आवाज च्या
१३ व्या वर्धापनदिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
*शुभेच्छुक*
मा.हिमालीताई नवनाथ कांबळे
पक्षनेत्या, आर.पी.आय., पुणे मनपा
अध्यक्ष आर.पी.आय महिला आघाडी पुणे शहर
नगरसेविका, पुणे महानगरपालिका



सा.संघर्षाचा आवाज च्या
१३ व्या वर्धापनदिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
*शुभेच्छुक*
मा.सौ.पल्लवी चंद्रशेखर जावळे
नगरसेविका, पुणे महानगरपालिका
अध्यक्षा - नाव समिती, पुणे महानगरपालिका


सा.संघर्षाचा
आवाज च्या
१३ व्या वर्धापनदिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
*शुभेच्छुक*
मा.ॲड.निलेश निकम
विरोधी पक्षनेता-पुणे महानगरपालिका
(राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अजित पवार)


सा.संघर्षाचा आवाज च्या
१३ व्या वर्धापनदिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
*शुभेच्छुक*
मा.ॲड.रामचंद्र कदम उर्फ
चंदुशेठ कदम
गटनेता-भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष
नगरसेवक, पुणे महानगरपालिका


सा. संघर्षाचा आवाज च्या
तेराव्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
ॲड. अविनाश राज साळवे
नगरसेवक, पुणे महानगरपालिका


सा. संघर्षाचा आवाजचा १३ व्या वर्धापनदिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
* शुभेच्छुक *
मा.अश्विनी डॅनियल लांडगे
नगरसेविका, पुणे महानगरपालिका
मा.डॅनियल लांडगे
सामाजिक कार्यकर्ते


सा.संघर्षाचा आवाजच्या १३ व्या वर्धापनदिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
मा.विशाल हरी मलके, नगरसेवक, पुणे महानगरपालिका
संचालक-स्मार्ट सिटी कार्पोरेशन,
सदस्य - वृक्ष संवर्धन व प्राधिकरण समिती पुणे, मनपा
मा.शहराध्यक्ष-युवक काँग्रेस, पुणे शहर


सा.संघर्षाचा आवाजचा १३ व्या वर्धापनदिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
मा.सायरा हनिफ शेख
नगरसेविका
पुणे महानगरपालिका
मा.हनिफ अब्बास शेख
मा.स्थायी समिती सदस्य, पुणे मनपा
मा.नगरसेवक, पुणे महानगरपालिका


साप्ताहिक
संघर्षाचा आवाज
वर्धापन दिन
निमित्त
हार्दिक शुभेच्छा
सत्य, निःपक्षता आणि जनहिताची भूमिका जपत समाजप्रबोधनाचे कार्य अधिक जोमाने सुरू राहो, हीच सदिच्छा.
गणेश बिडकर
सभागृह नेता, पुणे महानगरपालिका